## प्रकरण सहावे

# उपसंहार

शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी वाङ्‌मयाचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेतून केला आहे. पारंपरिक तमाशाचा एक नवा आविष्कार म्हणून अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्‌मयाचा आणि त्यांच्या लोकनाटयांचा विचार करता येईल. अण्णाभाऊंच्या या शाहिरी वाङ्‌मयाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. यातून त्यांनी समाजजीवनाचे चित्रण कशाप्रकारे केले आहे. तसेच वाङ्‌मयीन दृष्टया त्यांचे शाहिरी वाङ्‌मय कसे वैशिष्टयपूर्ण स्वरूपाचे आहे. विसाव्या शतकाच्या मध्यकालामध्ये अण्णाभाऊंचे शाहिरी वाङ्‌मय हे प्रबोधनात्मक शाहिरी वाङ्‌मय म्हणून यशस्वी ठरले, आणि समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यास उपयुक्त ठरले. यांचा विचार प्रामुख्याने प्रस्तुत अभ्यासातून मांडलेला आहे.

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणांमध्ये पारंपरिक मराठी शाहिरी कवितेच्या स्वरूपाविषयी विचार करून त्यामधून निर्माण झालेले सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे, राष्ट्रसेवादलाचे तमाशे, लालबावटा, कलापथक या नव्या अविष्काररूपांचा विचार केला आहे. या कलाप्रकारांनी पारंपरिक शाहिरी कवितेकडून कोणत्या गोष्टी स्वीकारल्या

ते पाहताना मराठी शाहिरी कवितेचे पारंपरिक रूप कसे आहे. हे सांगून " शाहीर " या शब्दाच्या व्युत्पत्ती संदर्भातील विविध मते पडताळलेली आहेत. पारंपरिक शाहिरी कवितेतील गण, गौळण, लावणी, पोवाडा आणि तमाशा यांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. हे जाणून वरील घटकांची व्युत्पत्ती व विकास कसा झाला याचाही विचार केला आहे.

पारंपरिक शाहिरी वाङ्‌मय हे पेशवेकाळामध्ये भरभराटीस आले आहे. या शाहिरी वाङ्‌मयाच्या प्रेरणा ह्या तत्कालीन काळाशी निगडित आहेत. पराक्रम आणि विलास या त्याच्या प्रमुख प्रेरणा होत्या. पारंपरिक शाहिरी वाङ्‌मयामधून प्रतिबिंबीत होणारे समाजजीवन हे रणांगणावरील शिपायाचेच अधिक आहे. मराठ्यांच्या भावभावनांचे व पराक्रमाचे रसभरीत वर्णन जसे या शाहिरी वाङ्‌मयात आले आहे. तसे तत्कालीन समाजजीवनातील परंपरा, रूढी, समजूती सामान्यांचे जीवन याचेही चित्रण येथे आहे. त्यामुळे तत्कालीन काळात मनोरंजनाचे एक साधन म्हणून पारंपरिक शाहिरी वाङ्‌मयाचे स्वरूप निश्चित झाले आहे.

विसाव्या शतकाच्या मध्यकाळामध्ये पारंपरिक शाहिरी कवितेचा नवा अविष्कार म्हणून सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे, राष्ट्रसेवादलाचा तमाशा व लालबावटा कलापथक इत्यादी रचना प्रकार तत्कालीन काळामध्ये सर्वसामान्य जनतेच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी व त्यांच्यामध्ये नवजागृती घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरलेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांनी या रचनाप्रकारातील काही वैशिष्ट्यांचे अनुकरण करून लोकमनावर नैतीक बोध करण्यासाठी व समाजामध्ये परिवर्तनवादी भूमिका रुजविण्यासाठी लोकनाट्यांची निर्मिती केली.

शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यामनावर कार्लमार्क्स, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज आणि समाजवादी पक्षाचे व राष्ट्रसेवादलाचे अनेक कार्यकर्ते यांच्या विचारांचा प्रभाव झाला आहे. त्यामुळे त्यांची शाहिरी रचना ही प्रबोधनात्मक आहे.

दुस-या प्रकरणामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या वाङ्.मयीन व्यक्तिमत्वाचा शोध घेतला आहे. अण्णाभाऊ हे प्रतिभावंत शाहीर, लोकनाटयाचे उद्गाते व श्रेष्ठ साहित्यिक म्हणून मराठी वाचकांना ज्ञात आहेत. त्यांनी कोणत्या प्रकारची वाङ्.मयनिर्मिती केली. याचा स्थूल आढावा घेऊन त्यामागील त्यांचा दृष्टिकोण कोणत्या प्रकारचा होता. याचा विचार या प्रकरणात केला आहे.

सुरवातीला अण्णाभाऊंची कुलपरंपरा सांगून त्यांचे शैक्षणिक जीवन व आवडीचे छंद कोणते होते. ते सांगितले आहेत. वयाच्या जडणघडणीत ते कम्युनिस्ट विचाराचे अनुयायी बनले. व ते कसे घडले याचा शोध घेतला आहे. त्याबरोबर त्यांचा वाङ्.मयीन दृष्टिकोण आणि प्रेरणा कोणत्या आहेत. तसेच त्यांची शाहिरी रचना, लोकनाटये कथा, कादंबरी यांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. याचाही विचार स्थूलपणे येथे केला आहे.

कार्लमार्क्स, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शाहू महाराज यांच्या वैचारिक प्रेरणेचा प्रभाव अण्णाभाऊंच्या मनावर झालेला आहे. कम्युनिस्ट विचारसरणीच्या पुरस्कारामुळे जातीय, वर्गीय हितसंबंधाच्या ते पूर्णपणे विरोधात आहेत. आपल्या बुध्दीला पटेल ते सत्य माननारे व समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या मूल्यांच्या वैचारिक सधनतेवर अण्णाभाऊंनी आपला वाङ्.मयविषयक दृष्टिकोन निश्चित केला आहे. त्यामुळे त्यांच्या समग्रसाहित्यचिंतनातून जगण्यासाठी

माणसांची चाललेली धडपड याचे चित्रण करणे. हेच त्यांच्या साहित्याचे प्रयोजन स्पष्ट होते. साहित्य हे माणसाच्या अज्ञानाचे उच्चाटन करून समाजपरिवर्तनासाठी एक प्रभावी साधन आहे. अशी वैचारिक भूमिका त्यांच्या एकूणच साहित्यसंपदेतून प्रत्ययाला येते.

ज्यांना समाजात स्थान नाही. अशा सामान्यांतील सामान्य माणसाला अण्णाभाऊंनी आपल्या कथा, कादंब-यांचे व लोकनाटयाचे नायक-नायिका बनवून त्यांच्या जीवनाचे चित्रण केले. हे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण आहे. त्यामुळे अण्णाभाऊंच्या जीवनाचे आणि साहित्याचे युयुत्सु दर्शन पाहिले की श्रमजीवी जनतेचा थोर सोवियत कलावंत मॅक्झिम गॉर्कीशी तुलना कराविशी वाटते.

अण्णाभाऊंच्या कथा-कादंब-या निर्मितीमागील पार्श्वभूमीचा विचार केल्यास ते ज्या मातंग समाजात जन्माला आले.त्या समाजाच्या चातु:वर्ण्य व्यवस्थेतील अमानुषतेतून व दु:खभोगातून त्यांच्या कथा-कादंब-यांची निर्मिती झालेली आहे. लहानपणी वाटेगावच्या कुशीत राहात असताना अनेक द-याखो-यातून-जंगलातून व वाटेगाव ते मुंबई-पर्यंतच्या पायी प्रवास करताना सभोवतालच्या जीवनांमध्ये अनेक त-हे-वाईक माणसे त्याना भेटली. त्यांचे चित्रण अतिशय खुमासदार शैली-मध्ये कथा-कादंब-यातून त्यांनी केले आहे. लोकजीवनांमध्ये जे अनिष्ट आहे. अन्याय आहे. अमानुष आहे, दांभिक आहे. त्याच्यावरती उघडपणे हल्ला केला आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या कथा-कादंब-यावर त्याकाळी अत्यंत लोकप्रिय असणा-या फडके-खांडेकरांच्या लेखनाचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या कथा-कादंब-याचे स्वरूप रंजनवादी झालेले आहे. पण

असे असले तरी कथा कादंब-यातून सामान्य माणसांच्या जीवन चित्रणास त्यांनी प्राधान्य दिले. ही गोष्ट विसरता येत नाही. मध्यमवर्गीय जाणीवेला बाजूला काढून त्यांनी खेडयापाडयातील माणसाच्या संवेदनशीलतेचा आणि भावभावनांचा अविष्कार केला, हे त्यांच्या लेखनाचे वेगळेपण आहे. केवळ रंजन करणे हे काही साहित्याचे प्रयोजन असत नाही. तर लोकांच्या मनावर संस्कार करणे, त्यांच्या . मनावर बोध करुन त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण तयार करणे हे साहित्याचे प्रयोजन असावे. ही अण्णाभाऊ साठे यांची भूमिका असल्याने त्या प्रयोजनानुरुप त्यांची वाङ्.मयनिर्मिती झालेली आढळते. यांचे साहित्य वाचत असताना त्यांचा वरील दृष्टिकोण वाचकांच्या प्रत्ययाला येतो.

अण्णाभाऊ साठे यांच्या कथा-कादंबरीमध्ये येणारी पात्रे ही तळागाळातील सामान्य पात्रे आहेत. ही सामान्य स्वरुपाची पात्रे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक बाबतीत होणा-या अन्यायाला धाडसाने प्रतिकार करणारी आहेत. प्रस्थापित समाजरचनेचा बंध तोडून मानवाच्या मूलभूत हक्काच्या प्राप्तीसाठी झगडणारी पात्रे अण्णाभाऊंनी संपूर्ण साहित्यामधून चित्रित केली आहेत. पात्रांच्या लढाऊपणाचे चित्रण हे वास्तव नसले तरी ते त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे तशाप्रकारचे चित्रण ते आपल्या साहित्यातून करतात.

अण्णाभाऊंनी कथा-कादंब-याप्रमाणेच पोवाडे, लावण्या, लोकगीते, समरगीते कृषीगीते आणि लोकनाटये यांची रचना केली आहे. त्यांची प्रतिभा शाहिरी वाङ्.मयाच्या माध्यमातून अत्यंत प्रभावी स्वरुपात व्यक्त झाली आहे. व तिच्यातून कडवा बंडखोरीचा हुंकार बाहेर पडला आहे. त्यांची शाहिरी रचना ही सामान्य जनता, दलित समाज व

कामगार यांचा कैवार घेऊन साकारलेली आहे. सामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण करणे. हा प्रमुख हेतू त्यांच्या शाहिरी वाङ्‌मयामधून व्यक्त झाला आहे. अण्णाभाऊ साठे यांचे हे वेगळेपण आहे. याची नोंद करावी लागेल. प्रस्तुत प्रकरणात या सा-या गोष्टीचे विवरण केले आहे. तसेच त्यांच्या वाङ्‌मयाची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे.

तिस-या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील आशयसुत्रे कोणती आहेत. हे सांगून आशयाच्या स्वरूपाविषयी विचार केला आहे. अण्णाभाऊ साठे हे कम्युनिस्ट विचाराचे पुरस्कर्ते असल्यामुळे व मार्क्सवादी तत्वज्ञानाने भारावून गेल्यामुळे श्रमजीवी, अर्धपोटी, अवस्थेत संसाराचा गाडा ओढणा-या श्रमजीवी कामगाराला मार्क्सचे तत्वज्ञान पटवून सांगण्याच्या मनोभूमीकेतून त्यांच्या लोकनाटयाचा जन्म झालेला आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार, संपुष्टात यावा. आणि एक नवा शोषणमुक्त समाज अस्तित्वात यावा. हा विचार त्यांच्या लोकनाटयामधून व्यक्त झाला आहे.

राजकीय जीवनातील भ्रष्ट नेतेमंडळी, सावकार, गांवकर, शेटजी-भटजी यांची शोषक वृत्ती, शेतमजूर त्यांचा भोळेपणा, कामगारांची अवस्था अशी अनेक आशयसुत्रे घेऊनच अण्णाभाऊंची लोकनाटये समाजमनासमोर उभी केली आहेत. तसेच जातीभेद, दैववाद, अंधश्रध्दा, इत्यादी गोष्टीवर हल्ले चढवून वर्गीय राजकारणाचे चित्रण करणे, समाजवादी विचाराचा पाया घालणे व मानवतावादाचा प्रसार करणे या हेतूने लोकनाटयातील आशयाचे स्वरूप निश्चित झाले आहे. समाजातील खालच्या म्हणून समजल्या गेलेल्या दीन, दुबळया, दरिद्री लोकांच्यामध्ये बोकाळलेली बुवाबाजी, अंधश्रध्दा, भोंदूगिरी, यांचे चित्रण करुन अज्ञान व दारिद्रय यासारख्या अवगुणांच्यावर अण्णाभाऊंनी लोकनाटयातून कोरडे ओढले आहेत. तसेच आशयाच्या किंवा घाटाच्या बाबतीत

कसलाही साचा न ठेवता जाणिवेचा मुक्त आविष्कार करून सत्याचे दर्शन अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामध्ये घडविले आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील वाङ्‌मयीन विशेषांचा विचार केला आहे. यामध्ये लोकनाटयरचनेचे स्वरूप सांगून लोकनाट्यातील स्वभावचित्रण, प्रसंगनिर्मिती, संघर्ष, विनोद, संवाद आणि बतावणी यांचा विचार केला आहे.

अण्णाभाऊंनी पारंपरिक गणाचे स्वरूप स्वीकारले. पण त्याच्या अधिष्टाणामध्ये बदल केला. हा बदल वैशिष्टपूर्ण आहे. म्हणजे सम-कालाशी एकरूप होऊन रचलेला गण हा वास्तवाचे समर्थ दर्शन घडवितो. अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरी रचनेमध्ये गौळणीला पूर्ण फाटा दिला.

अण्णाभाऊ साठे यांनी लोकनाटयाचे नाटयतंत्र आपल्या दृष्टि-कोनानुसार निश्चित केले आहे. त्यामुळे त्यांच्या लोकनाटयाचे स्वरूप हे अधिक लवचिक बनले आहे.

अण्णाभाऊंनी अन्याय करणारी आणि अन्याय सहन करणारी अशा दोन प्रकारच्या पात्रांच्या परस्पर संबंधातून स्वभावचित्रणावर अधिक प्रकाश टाकला आहे. त्यामुळे माणसाचे मन आणि भावना यांच्या उत्कटतेचा अविष्कार झाला आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील सामाजिक व आर्थिक विषमता यांच्यातील संघर्षाचे चित्रण केले आहे. अनितीमान व्यक्तींना हास्यास्पद ठरवून त्यांचा आपमतलबीपणा लोकां-च्यासमोर मांडला आहे. अशाप्रकारे त्यांच्या लोकनाटयातून संघर्ष व्यक्त झाला आहे. परंतु हा संघर्ष दोन व्यक्ती किंवा दोन पक्ष यांच्यातील संघर्ष नसून मुख्यत्वेकरून दोन भिन्न प्रवृत्तीमधील संघर्ष आहे. अण्णाभाऊ पात्रांचे परस्पर संबंध हे विक्षिप्त स्वरूपात चित्रित करतात. पात्रांच्या

विक्षिप्त स्वरूपाच्या वर्तनातून विनोद निर्मिती साधलेली आहे. त्यामुळे त्यांचा विनोद केवळ श्रृंगारिक नाही तर त्याला उपरोधाची धार आहे. अण्णाभाऊंनी संवादाच्या बाबतीतही एक महत्वाचा बदल केला आहे. त्यांच्या लोकनाटयातून जसे गद्यस्वरूप संवाद व्यक्त होतात. त्याप्रमाणे पद्यात्मक संवादाचीही रचना केली आहे. तसेच त्यांच्या बतावणीमध्ये त्यांनी केलेला बदल हा महत्वाचा आहे. त्यांची बतावणी ही रंजक आहे. पण ती काल्पनिक नसून वास्तवाधिष्टीत आहे. हे त्यांचे वेगळेपण नमूद केले आहे.

पाचव्या प्रकरणांमध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी काव्याचा विचार केला आहे. यामध्ये गण, गौळण, लावणी आणि पोवाडा यांचा विचार केला आहे. गण, गौळण, लावणी आणि पोवाडा या त्यांच्या रचनेचे स्वरूप पारंपरिक रचनेची अनेक वैशिष्टये आत्मसात करून समृध्द झाले आहे. पण पारंपरिक आशयाला फाटा देऊन नव्या आशयाची मांडणी त्यांनी या रचनेमध्ये केली आहे. म्हणजे त्यांच्या शाहीरी रचनेचे स्वरूप हे काल्पनिक विषयावर आधारित नाही. तर वास्तवाधिष्टीत आहे. त्यांच्या शाहिरी रचनेमध्ये येणारे विषय हे समकालाशी एकरूप झालेले आहेत. जातीभेद, अंधश्रध्दा, या विषयाबरोबर राजकीय व सामाजिक समस्यांचे आणि विषमतेचे केलेले चित्रण हे वैशिष्टयपूर्ण आहे.

अण्णाभाऊंनी पारंपरिक गणाचे स्वरूप स्वीकारले. पण त्याच्या अधिष्टाणामध्ये केलेला बदल हा महत्वाचा आहे. तसेच अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या शाहिरी रचनेमध्ये " गौळण" हा रचना प्रकार पूर्णपणे संपुष्टात आणला व त्याठिकाणी म्हणणी आणली. यातून त्यांच्या रचनेची सखोलता लक्षात येते. अण्णाभाऊंची लावणी ही रंजक आहे. पण ती काल्पनिक वा श्रृंगारिक नाही. तर वास्तवाचे समर्थ दर्शन घडविते. तत्कालीन समाजजीवनातील अनेक घटना आणि प्रसंग निवडून केलेली लावणीची रचना ही वैशिष्टयपूर्ण आहे. अण्णा-

भाऊंनी पोवाडयाची निर्मिती करताना ऐतिहासिक घटना आणि प्रसंग यावर आधारित पोवाडयाची रचना केलेली नाही. तर समकालीन जीवनांतील स्पंदने त्यामध्ये उमटली आहेत. त्यामुळे अण्णाभाऊंचे पोवाडे वाचताना तत्कालीन स्थितीगतीचे भान लक्षात येते.

एकूणच अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी वाङ्‌मयाचा अभ्यास करताना पारंपरिक शाहिरी रचनेतील काही महत्वाची वैशिष्टये स्वीकारून निर्माण केलेली शाहिरी रचना ही प्रबोधनात्मक आहे. तसेच ती लोकजागृती घडवून आणण्यास समाजमनाला सहाय्यभूत ठरलेली आहे. विषयात आणि आशयात कमालीची बंडखोरी निर्माण केली आहे. त्यामुळे अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी रचना ही जाणिवेचा मुक्त शोध घेणारी अशी आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


| | |
|---|---|
| १. आद्य रंगाचार्य (अनुवादक- रा. प्र. कानिटकर ) | भारतीय रंगभूमी, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९७५. |
| २. कर्डक, भिमराव | आंबेडकरी जलसे : स्वरूप व कार्य, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७८. |
| ३. क-हाडे, सदा | मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९९०. |
| ४. कुलकर्णी, वि. म. आणि मोरजे, गंगाधर (संपा.) | रामजोशीकृत लावण्या, चित्रशाला प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी, १९७३. |
| ५. कुलकर्णी, वा. ल. (संपा.) | मराठी नाटक आणि रंगभूमी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३. |
| ६. खराट, संभाजी | महात्मा फुले व सत्यशोधक जलसे, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९०. |
| ७. गुरव, बाबुराव | अण्णाभाऊ साठे: लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९१. |

८. गुरव, बाबुराव — *अण्णाभाऊ साठे: समाजविचार आणि साहित्य विवेचन*, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १२९१.

९. जैतापकर, पां. ल. — *तमाशा कला*, साहित्यसेवा प्रकाशन औरंगाबाद.

१०. जोग, रा. श्री. (संपा.) — *मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड तिसरा*, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १२७३.

११. जोशी, महादेवशास्त्री (संपा.) — *भारतीय संस्कृति कोश, खंड-८*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७४.

१२. जोशी, वि. कृ. — *लोकनाटयाची परंपरा*, ठोकळ प्रकाशन, पुणे, १२६१.

१३. ठाकूर, भगवान — *भीमराव कर्डक यांचे आंबेडकरी जलसे : एक चिकित्सक अभ्यास*, पुणे विद्यापीठात एम. फिल. पदवीसाठी सादर केलेला लघुशोधप्रबंध, १९८७.

१४. देशपांडे, दत्तराज (संपा.) सार्थ श्रीज्ञानेश्वरी, सारथी प्रकाशन, पुणे, आवृत्ती नववी १९९४.

१५. पाटील, बी. एम. कलंदर प्रेषित, प्रकाशक: गो. ह. चांदणे, कोल्हापूर, १२८१.

१६. बनहट्टी, श्री. ना. मराठी नाटयकला आणि नाटयवाङ्मय, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९५९.

१७. बागल, माधवराव खंडेराव (संपा) सत्यशोधक हिरकमहोत्सव ग्रंथ, श्री. शाहू सत्यशोधक ग्रंथ प्रकाशन, करवीर, १९३३.

१८. ब्रम्हे, मो. द. मराठी नाटयतंत्र, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, शाके १८८६.

१९. भावे, वि. ल. महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पाचवी, १९६३.

२०. भोसले, तं. सा. (संपा.) अण्णाभाऊ साठे : अप्रकाशित वगनाटये, लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२.

२१. मोरजे, गंगाधर — *मराठी लावणी वाङ्मय*, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७४.

२२. राजवाडे, वि. का. (संपा.) — *महिकावतिची बखर*, चित्रशाला प्रकाशन, पुणे, १९२६.

२३. विटेकर, वि. ब. — *असे होते अण्णाभाऊ साठे*, छाया प्रकाशन, एरंडवणे, १९८६.

२४. व्हटकर, नामदेव — *मराठीचे लोकनाटय तमाशा: कला आणि साहित्य* यशश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९७५.

२५. शिंदे, विश्वनाथ — *पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाटय*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९४.

२६. सरदार, गं. बा. — *महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार*, मुंबई ग्रंथाली, १९८१.

२७. सहस्त्रबुध्दे, म. ना. — *मराठी शाहिरी वाङ्मय*, ठोकळ प्रकाशन, पुणे.

२८. सुर्यवंशी, कृ. गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४.

२९. हिवराळे, सुखराम (संपा.) सत्यशोधकी आणि आंबेडकरी जलसे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १२२४.

## साधन ग्रंथ सूची


१. साठे, अण्णाभाऊ — स्तालिनग्राडचा पोवाडा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रकाशन, ९ मे, १९८५.

२. साठे, अण्णाभाऊ — वैजयंता, मॅजेस्टिक बुक स्टॉल, आवृत्ती चौथी, १९७८.

३. साठे, अण्णाभाऊ — बरबाधा कंजारी, विद्यार्थी प्रकाशन, १९६०.

४. साठे, अण्णाभाऊ — नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती दुसरी, १९८०.

५. साठे, अण्णाभाऊ — देशभक्त घोटाळे, विद्यार्थीप्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, १९८७.

६. साठे, अण्णाभाऊ — शाहीर, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८५.

## लेखसूची


१. अत्रे, प्रल्हाद केशव — साप्ताहिक नवयुग, २४/१०/१९४८.

२. क-हाडे, सदा — अण्णाभाऊ साठे : यांची वगनाट्ये, लोकराज्य, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक, संपादक दिवाकर गंधे, नोव्हेंबर १९९३.

३. कोतापल्ले, नागनाथ — तमाशा ते वगनाट्य, बळीराजा, ग्रामीण साहित्य विशेषांक, संपादक प्र. बा. भोसले, ऑक्टोबर ८४.

४. जोग, वि. स. — लोकनाट्य आणि अण्णाभाऊ साठे, अस्मितादर्श, संपादक गंगाधर पानतावणे, १९७६, अंक १.

५. सुर्वे, नारायण — अण्णाभाऊंच्या कादंब-या, लोकराज्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक, संपादक दिवाकर गंधे, नोव्हेंबर १९९३.

६. होवाळ, वामन — मला भेटलेला शाहीर : अण्णाभाऊ, अस्मितादर्श, संपादक-गंगाधर पानतावणे, १९८२.